# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये आणखी एका वाघिणीचे स्थानांतर

**सातारा : हॅलो प्रभात**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोलारा कोअर रेंजमध्ये पकडण्यात आलेली 'T7-S2' ही वाघीण, म्हणजेच ताडोबातील प्रसिद्ध 'छोटी तारा'ची मुलगी, अखेर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात दाखल झाली आहे. साधारण दोन वर्षांची ही वाघीण 'ऑपरेशन तारा' अंतर्गत तब्बल ९०० किमीच्या प्रवासानंतर चांदोली राष्ट्रीय उद्यानातील सोनारली अनुकूलन कुंपणात सॉफ्ट रिलिज करण्यात आली.



केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने ताडोबा आणि पेंच येथून तीन नर व पाच मादी अशा आठ वाघांच्या स्थानांतरणास मंजुरी दिली असून त्यातील ही आणखी एक महत्त्वपूर्ण पायरी पूर्ण झाली आहे.

८ डिसेंबर रोजी पांढरपौनी परिसरात ही वाघीण सुरक्षितपणे पकडण्यात आली. वैद्यकीय तपासणीत ती पूर्णपणे तंदुरुस्त असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तिचे स्थलांतर करण्यात आले. सोनारलीतील सॉफ्ट रिलिज पद्धतीमुळे वाघीण सुरक्षित कुंपणात राहून स्थानिक भूभाग, भक्ष्यसाखळी आणि पर्यावरणाशी सावकाश जुळवून घेणार आहे. तिच्या वर्तणुकीवर भारतीय वन्यजीव संस्थेचे वैज्ञानिक डॉ. के. रमेश आणि फील्ड बायोलॉजिस्ट आकाश पाटील सतत लक्ष ठेवून आ-हेत.

या संपूर्ण प्रक्रियेचे राष्ट्रीय स्तरावर निरीक्षण व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTC) करत असून, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे सहाय्यक निरीक्षक डॉ. नंदकिशोर काळे व मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांच्या देखरेखीखाली स्थानांतरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले. मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथकांनी ही मोहीम राबवली.

> **'वाघीण T7-S2' ही कोलारा कोअर रेंज, पांढरपौनी परिसरातील तरुण, सशक्त व नैसर्गिकरीत्या भ्रमणशील मादी आहे. 'ऑपरेशन तारा' अंतर्गत स्थलांतरित होणारी ही दुसरी मादी असून, तिची उपस्थिती सह्याद्री परिसरातील वाघ संवर्धनास अधिक बळकटी देईल.**
>
> **●डॉ. प्रभुनाथ शुक्ला**
> **क्षेत्र संचालक : ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प**

> **ताडोबामधून आणलेल्या दुसऱ्या वाघिणीचे सॉफ्ट रिलिज हा सह्याद्रीतील वाघ पुनर्स्थापन मोहिमेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. चांदोली परिसरात तिला सुरक्षित अधिवास व पुरेशा प्रमाणात भक्ष्यसाठा उपलब्ध आहे. आमची क्षेत्रीय पथके व शास्त्रीय तज्ज्ञ संस्था तिच्या देखरेखीसाठी पूर्णतः सज्ज आहेत.**
>
> **● तुषार चव्हाण**
> **क्षेत्र संचालक : सह्याद्री व्याघ्र प्रकल्प**

# पहिल्या 'इंडो-स्वीडिश सीसीयू'साठी अंबुजा सिमेंट्सची निवड

**अहमदाबाद : हॅलो प्रभात**

अदाणी पोर्टफोलिओचा भाग असलेली आणि जगातील नववी सर्वात मोठी बिल्डिंग मटेरियल सोल्यूशन्स कंपनी असलेली अंबुजा सिमेंट्स, आयआयटी बॉम्बे आणि स्वीडनच्या ईको टेक यांच्या सहकार्याने कार्बन कॅप्चर अँड युटिलायझेशन साठी प्री-पायलट तांत्रिक अभ्यास करण्यासाठी इंडो-स्वीडिश अनुदान मिळवणारी पहिली सिमेंट कंपनी ठरली आहे.

या प्रकल्पाचा उद्देश भारत आणि स्वीडनमधील भागीदारांनी एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर वापरता येईल असे, पर्यावरणपूरक आणि उद्योगासाठी तयार उज× कॅप्चर करणे व त्याचा उपयोग करण्याचे तंत्रज्ञान विकसित करणे आहे.

या पद्धतीमुळे उत्सर्जन कमी होईल आणि हरित इंधन व नवीन पर्यावरणपूरक साहित्य तयार करण्याचा मार्ग मोकळा होईल.



# शरद कृषीच्या विद्यार्थ्यांची क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**जैनापूर : हॅलो प्रभात**

येथील शरद कृषी महाविद्यालयातील सहा खेळाडूंची महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीच्या संघात निवड झाली आहे. राज्यस्तरीय होणाऱ्या २७ वी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५-२६ ही स्पर्धा नांदेड येथे होत आहे.

राष्ट्रीय खेळाडू प्रगती कर्नाळे हिची फुले कृषी विद्यापीठ राहुरीच्या संघाच्या ध्वज संचलन करण्याचा बहुमान मिळाला. राहुरीच्या संघामध्ये प्रगती ही संघाची कर्णधार (खो-खो), रत्नम गौडाजे (खो खो), वैभव शिंदे (बास्केटबॉल), श्रुती शिंदे (बास्केटबॉल), प्रज्ञा अकिवाटे (हॉलीबॉल), आदित्य खिलारे (बुद्धिबळ), तसेच प्रा. दादासाहेब मगदूम यांची व्हॉलीबॉल मुलांच्या संघाचे कोच व मुलींच्या संघाकडे टीम मॅनेजर म्हणून निवड झाली आहे.

या सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांचे संस्थेचे अध्यक्ष आ. डॉ. राजेंद्र पाटील (यड्रावकर), संस्थेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सारिका कोळी, उपप्राचार्य प्रा. संजय फलके, क्रीडा शिक्षक दादासाहेब मगदूम यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'उबाठा'च्या बेगडी हिंदुत्वाचा पर्दाफाश झाला

**नवनाथ बन यांचा हल्लाबोल**

**मुंबई : हॅलो प्रभात**

न्यायमूर्ती स्वामीनाथन यांनी १ डिसेंबर रोजी मदुराई येथील मंदिरात 'तिरुपरनकुंद्रम दीपम' प्रज्वलित करण्याची परंपरा पुन्हा सुरू करण्याचे निर्देश दिले. अशा न्यायमूर्तीविरोधात महाभियोग आणण्यासाठी संसदेत उबाठा गटाच्या खासदाराने स्वाक्षरी केली आहे. मंदिराच्या परंपरेला न्याय देणाऱ्या न्यायमूर्तींवर महाभियोग म्हणजे विरोधकांचा हिंदूविरोधी कट असून त्याला उबाठा गटाची सक्रिय साथ आहे. हिंदूंचा, देवदेवतांचा आणि त्यांना मते देणा-या मतदारांचा अपमान उबाठा गट करत आहे असा हल्लाबोल भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी बुधवारी केला. प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आपल्या खासदाराची ही भूमिका उद्धव ठाकरे यांना मान्य आहे का, अशा खासदारावर काय कारवाई करणार अशी प्रश्नांची सरबत्तीही त्यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी कारवाई केली नाही तर त्यांचे हिंदूंवरचे प्रेम हे बेगडी असल्याचे सिद्ध होईल असाही घणाघात श्री. बन यांनी केला. पत्रकार परिषद घेऊन उद्धव यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करायला हवी असे आव्हान श्री. बन यांनी दिले.



# घोरपडे कारखान्याचे १६ ते ३० नोव्हेंबरचे ऊसबिल जमा

## उर्वरित रू. १०० गाळप हंगाम समाप्तीनंतर : नवीद मुश्रीफ

**बेलेवाडी काळम्मा : हॅलो प्रभात**

सरसेनापती संताजी घोरपडे कारखान्याने चालु गळीत हंगामाच्या दि. १६ नोव्हेंबर ते दि. ३० नोव्हेंबर या पंधरवड्यातील प्रतिटनाला रू. ३४०० प्रमाणे उसबिले जमा केली आहेत. तोडग्यानुसार प्रतिटनाला रू. १०० गळीत हंगाम समाप्तीनंतर दिले जाणार आहेत. अशी प्रतिटनाला एकूण रू. ३, ५०० डव्हान्स होणार आहे.

या दुसऱ्या पंधरवड्यात कारखान्याने ९६, ५४९ मेट्रिक टन उसाचे गाळप केले आहे. दरम्यान; एक नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या पंधरवड्यातील तोडणी वाहतूक बिलेही अदा केल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष व गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष नवीद मुश्रीफ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

याबाबत मुश्रीफ यांनी पत्रकात पुढे म्हटले आहे, तोडग्यानुसार रु. ३४०० पहिला हप्ता आणि उर्वरित रू. शंभर कारखान्याचा हंगाम संपल्यानंतर असे प्रतिटनाला एकूण डव्हान्स रु. ३५०० दिले जाणार आहेत, असे जाहीर केले होते.

त्यानुसार, सरसेनापती सताजी घोरपडे साखर कारखान्याकडे गाळप हगाम २०२५-२६ मध्ये दि. १६ नोव्हेंबर ते दि. ३० नोव्हेंबर अखेर गाळपास आलेल्या ९६, ५४९ मेट्रिक टन उसाची बिले प्रतिटन रू. ३४०० प्रमाणे अदा केली आहेत.

तसेच तोडग्यानुसार द्यावयाचे उर्वरित रू. १०० गाळप हंगामानंतर अदा करणार आहोत. गुरूवारपासून दि. ११ शेतकऱ्यांनी आपापल्या संबंधित बँकेशी संपर्क साधावा.



# विजेंद्र अकॅडमीस विराज नाईक यांची भेट

**शेडगेवाडी : हॅलो प्रभात**

येथील विजेंद्र करिअर अकॅडमी येथे विराज उद्योग समूहाचे अध्यक्ष विराज नाईक यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी पोलीस भरती करणाऱ्या युवकांना भरतीसाठी शुभेच्छा देताना ते म्हणाले, कठोर परिश्रमाचा निश्चितच फायदा होतो. शिराळा तालुक्याच्या मताती गुणवत्ता आहे. त्याला योग्य दिशा व मार्गदर्शन मिळाल्याने वेळोवेळी राज्य व केंद्रीय लोकसेवेत तसेच इतर विविध स्पर्धात्मक परीक्षेतून अनेक प्रकारचे अधिकारी दिले आहेत. पोलीस दलासह इतर विविध विभागात सेवा बजावत आहेत. विजेंद्र करिअर अकॅडमी युवकांना घडविण्यासाठी परिश्रम घेत आहे. मन, मनगट व बुद्धीच्या जोरावर युवकांनी अपेक्षित लक्ष्य गाठण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावेत. यावेळी उपस्थित अकॅडमीचे संस्थापक निलेश भाकरे व महादेव शेडगे उपस्थित होते.

# क्रीडा स्पर्धांमध्ये खिलाडू वृत्ती महत्त्वाची

**जिल्हाधिकारी अशोक काकडे**

**सांगली : हॅलो प्रभात**

क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाडूंमधील खिलाडू वृत्ती खूप महत्त्वाची असते. भावी काळात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी हीच वृत्ती महत्त्वाची ठरेल, असा विश्वास जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी व्यक्त केला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी सांगली, वाळवा तालुका शिक्षण संस्थेचे विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि खा. एस. डी. पाटील चॅरिटेबल ट्रस्ट उरुण ईश्वरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने १९ वर्षाखालील मुले व मुलींच्या राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.




यावेळी कोल्हापूर विभागाचे क्रीडा उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, उपविभागीय अधिकारी श्रीनिवास अर्जुन, तहसीलदार सारिका रासकर तसेच राष्ट्रीय हॉकी खेळाडू संजय पाटील, वाळवा तालुका शिक्षण संस्थेचे सहसचिव ॲड. धैर्यशील पाटील आदि उपस्थित होते.




# सोलिसकडून प्रगत आणि शक्तिशाली ट्रॅक्टर्सचे प्रदर्शन

**सातारा : हॅलो प्रभात**

सोलिस या इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडच्या प्रमुख ब्रँडने महाराष्ट्रातील पुणे येथे किसान ॲग्री शो २०२५ मध्ये सर्वात शक्तिशाली मल्टीस्पीड ट्रॅक्टर्सच्या नाविन्यपूर्ण व व्यापक श्रेणीला दाखवले आहे. यामध्ये नुकतेच लाँच करण्यात आलेल्या सोलिस जेपी ९७५ ट्रॅक्टरचा समावेश आहे, जो पूर्णपणे नेक्स्ट जनरेशन प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आला आहे, तसेच सॉलिस २७१६ एसएन आणि यानमार वायएम २३५ अशा नेक्स्ट-जनरेशन मॉडेल्सचा समावेश आहे, जे शेतकऱ्यांना अधिक आऊटपुट देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

या नवीन मॉडेल्सना पूरक म्हणून कंपनीच्या श्रेणीमध्ये सोलिस ५७२४ ४ डब्ल्यूडी आणि वायएम ३४८ आर देखील आहेत, जे विशेषत: प्रत्येक विकसित किसानला सर्वोत्तम आरामदायीपणा आणि उच्च ऑपरेशन कार्यक्षमता देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

# ऋतुजा एकुंडे यांना लोखंडे रिसर्च फेलोशिप जाहीर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील संशोधक ऋतुजा अनिल एकुंडे यांना 'प्रा. सी. डी. लोखंडे एण्डोमेंट चॅरिटेबल ट्रस्ट रिसर्च फेलोशिप २०२५-२६' जाहीर झाली आहे. त्या डॉ. संजय लठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली 'फोटोथर्मल सुपरहायड्रोफोबिक कोटिंग्स' विषयावर संशोधन करत आहेत.

डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर येथे प्रा. सी. डी. लोखंडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. या प्रसंगी प्रा. डॉ. पी. एस. पाटील आणि प्रा. एस. डी. सरताळे आदी मान्यवर उपस्थित होते. ऋतुजा यांना प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांसह महाविद्यालयातील विविध मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले.



# प्रा. डॉ. व्ही. एस. गणाचारी यांची गौरवशाली कामगिरी

**राजारामनगर : हॅलो प्रभात**

येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधील मेकाट्रॉनिक्स इंजिनियरिंगविभागातील प्रा. डॉ. व्ही. एस. गणाचारी यांनी न्यू तायपेई सिटी, तैवान येथे आयोजित ११वी इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑफ एशियन सोसायटी फॉर प्रिसिजन इंजिनियरिंग ॲण्ड नॅनोटेक्नॉलॉजी (ए. एस. पी. ई. एन.-२०२५) मध्ये उल्लेखनीय कामगिरी करून संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे.



या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांनी ऑप्टिमायझेशन ऑफ इलेक्ट्रोकेमिकल मशीनिंग पॅरामीटर्स फॉर इनकोनेल ७१८ युजिंग श्र २ ज ३ नॅनोपार्टिकल्स ॲण्ड मशीन लर्निंग टेक्निक्स या शीर्षकाचा संशोधनप्रबंध सादर केला. उच्च तापमान आणि उच्च शक्ती असलेल्या सुपर अलॉय इनकोनेल ७१८ च्या कार्यक्षम मशीनिंगसाठी नॅनोपार्टिकल्स आणि मशीन लर्निंग चा संयुक्त वापर दर्शवणारे हे संशोधन परिषदेतील तज्ज्ञांसाठी विशेष आकर्षण ठरले. त्यांच्या या प्रभावी कार्याला परिषदेत सर्वाधिक मानाचा 'बेस्ट पेपर अवॉर्ड' जाहीर करण्यात आला. जगभरातील नामांकित संशोधकांनी सहभाग घेतलेल्या या परिषदेत हा पुरस्कार मिळविणे आर आय टी साठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली असून संस्थेच्या संशोधन क्षमतेचा ठसा उमटवणारे आहे. या यशानंतर संस्थेचे संचालक प्रो. डॉ. पी. व्ही. कडोले यांनी गौरवोद्गार व्यक्त करताना म्हटले- डॉ. गणाचारी यांचे उच्च दर्जाचे संशोधन हे आर आय टी च्या नवोन्मेषी संस्कृतीचे द्योतक आहे. आमचा भर नेहमीच उच्च गुणवत्ता असलेल्या संशोधन, तांत्रिक उत्कृष्टता आणि उद्योगाभिमुख प्रकल्पांवर राहिला आहे. त्यांचे हे उल्लेखनीय कार्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून संपूर्ण संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. अशा गुणवत्तापूर्ण संशोधनामुळे आर आय टी ची विश्वासार्हता आणि प्रतिष्ठा जागतिक स्तरावर अधिक दृढ होत आहे.

गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष भगतसिंग पाटील, सदस्य आमदार जयंतराव पाटील, आणि सचिव प्रो. आर. डी. सावंत यांनीही प्रो. डॉ. गणाचारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.डॉ. गणाचारी यांची ही उत्कृष्ट कामगिरी आर आय टी च्या संशोधन-अभिमुख प्रवाहाला बळकट करणारी असून, संस्था देशातील तसेच जागतिक स्तरावरील अग्रगण्य तांत्रिक शिक्षण संस्थांमध्ये स्वतःचे स्थान अधिक मजबूत करत आहे.